MHNG120010982022

दाखल तारीख – १७.१०.२०२२
नोंदणी तारीख – १७.१०.२०२२
निकाल तारीख – ०८.०५.२०२५
कालावधी – वर्ष महिने दिवस
०२ ०६ २१

**फॉर्म – अ**

नि.क्र.१२

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, नरखेड, जि.नागपूर**

(पिठासीन अधिकारी – श्रीमती वृषाली दिनानाथ सुंगारे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६३८/२०२२**

**न्यायनिर्णयाचा दिनांक – ०८.०५.२०२५**

| | |
|---|---|
| अपराध क्रमांक व पोलीस स्टेशन | अपराध क्र.३२०/२०२२<br>पोलीस स्टेशन – नरखेड |
| तक्रारदार/फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, नरखेड |
| प्रतिनिधीत्व | श्री.जी.बी.राउत, विशेष सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | सुरज कैलास फरकसे, वय २९ वर्ष, व्यवसाय–मजुरी<br>रा. नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर |
| प्रतिनिधीत्व | श्री.एस. ए. लोणे, विधीज्ञ |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख, वेळ व ठिकाण | दिनांक ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.३० ते ९.३५ वाजताच्या दरम्यान मौजा– नरखेड शिवार, ता. नरखेड, जि. नागपूर |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २०.०८.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १७.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०५.१२.२०२२ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | ०५.०६.२०२३ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | ०८.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०८.०५.२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

**फॉर्म — क**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष /दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ च्या उददेशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरज कैलास फरकसे | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४-अ व कलम १८४ मोटार वाहन कायद्यानुसार | निर्दोष | -- | -- |

**- न्यायनिर्णय -**

(दिनांक ०८.०५.२०२५ रोजी घोषित)

१. आरोपिविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४-अ व कलम १८४ मोटार वाहन कायद्यानुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन त्याच्याविरुध्द सदर खटला चालविण्यात आलेला आहे.

२. सरकारीपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे कि-

दि. २०.०८.२०२२ रोजी पो. शि. शैलेश डोंगरदिवे याने पोलीस स्टेशन नरखेड येथे लेखी फिर्याद दिली की, दि. ०९.०८.२०२२ रोजी ते सकाळी ८ ते रात्री

८ वाजेपर्यंत डे ऑफीसर ड्यूटीवर हजर असताना भावेश उर्फ भासु तुळशीराम मदनकर याने फोनद्वारे कळवले की, दि. ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजताच्या दरम्यान जखमी रवि मोतीराम रेवतकर यांना अलटो कारचा धक्क लागल्याने त्यांचा अपघात होवून ते जखमी झाले असून त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय नरखेड येथे नेले आहे. तेव्हा फिर्यादी हा जखमीचे बयाण नोंदवण्यासाठी ग्रामीण रूग्णालय नरखेड येथे गेला असता जखमी हा बयाण देण्यास सक्षम नसल्याने फिर्यादी हा घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयाण नोंदवण्यासाठी गेला तेथे त्याला माहिति मिळाली की, जखमी रविंद्र रेवतकर हा चहा पेवून भावेश मदनकर याच्या दुकानासमोरील रोडवर बसला असता तेव्हा मारोती अल्टो कार क्र. एम. एच. ३१ सी. एन. ०९१० च्या चालकाने रविंद्र रेवतकरला धडक मारली त्यामुळे तो जखमी झाला व त्याला उपचारासाठी ग्रामीण रूग्णालय नरखेड येथे उपचाराकरिता नेले व तेथून त्याला मेयो हॉस्पीटल नागपूर येथे रेफर करण्यात आले व तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन गुन्हा क्र. ३२०/२०२२ ची नोंद करण्यात आली. तपासादरम्यान संबंधीत तपासी अधिका–याने पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, मयताचे वैद्यकीय उपचाराचे कागदपत्र गोळा केले, मयताचे पंचांसमक्ष मरणान्वेषन प्रतिवृत्त तयार केले, मयताचे शवविच्छेदन करवुन घेउन त्याचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त केले, साक्षिदारांचे जबाब नोंदविले, अपघातामध्ये सामिल असलेली अपघातग्रस्त वाहनाची प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर ग्रामिण कडून निरीक्षण करुन घेतले व त्याबाबतचा निरीक्षण अहवाल प्राप्त केला व तपासाअंती आरोपीविरुध्द भक्कम पुरावा मिळून आल्याने उपरोक्त नमुद कायद्याअंतर्गत दोषारोपपत्र तयार करण्यात आले व न्यायालयात सादर करण्यात आले.

४. नि.क्र. १२ प्रमाणे आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ व १८४ मोटार वाहन कायदा अन्वये दोषारोप निश्चीत करण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल नाही असे सांगुन खटला चालविण्याची मागणी केली.

५. आरोपिविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ व १८४ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे खालील साक्षिदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

**फॉर्म – ड**

फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/साक्षिदारांची यादी.

(अ) फिर्यादी साक्षिदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | शरद दशरथ मदनकर | घटनास्थळ पंच | १२ |
| २ | योगेश उर्फ मुन्ना नरसिंग गोहडे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १२ |
| ३ | भावेश तुळशीराम मदनकर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १२ |
| ४ | रत्नाकर विठ्ठलराव शेंडे | घटनास्थळ पंच | १२ |
| ५ | खुशाल गोविंदराव रेवतकर | साक्षदार | १३ |

(ब) बचावपक्ष साक्षिदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

(क) न्यायालय साक्षिदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय निशाणी क्रमांक यादी.

(अ) फिर्यादी निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(ब) बचाव पक्षाने मान्य केलेल्या दस्ताऐवजांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| – | – | – |

(क) बचावपक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(ड) न्यायालय निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(इ) मुददेमाल वस्तु क्रमांक

| अ.क्र. | मुददेमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

६. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे जवाब नोंदविण्यात आला असता त्याने नकाराचा व प्रकरण खोटे असल्याचा बचाव उपस्थित केला.

७. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझ्या विचारात उपस्थित झाले. सदर मुदयांना मी माझे निष्कर्ष त्या खाली दर्शविलेल्या कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सरकारीपक्षाने सिध्द केले आहे काय कि, दिनांक ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.३० ते ९.३५ वाजताच्या दरम्यान मौजा– नरखेड शिवार, ता. नरखेड, जि. नागपूर येथे आरोपीने मानवी जिवीतास किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने त्याच्या ताब्यातील अल्टो कार क्र. एम. एच. ३१ सी. एन. ०९१० ही निष्काळजीपणे सार्वजनिक ठिकाणी चालविली व त्याव्दारे भारतीय दंड संहितेच्या कलम २७९ नुसार दंडनिय अपराध केला ? | नाही |
| २ | सरकारीपक्षाने सिध्द केले आहे काय कि वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने मानवी जिवीता धोक्यात येईल | |

| | | |
|---|---|---|
| | अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहोचविण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने त्याच्या ताब्यातील ताब्यातील अल्टो कार क्र. एम. एच. ३१ सी. एन. ०९१० ही निष्काळजीपणे सार्वजनिक ठिकाणी चालविली व फिर्यादीच्या भावाच्या मृत्युस कारणीभुत ठरला व त्याव्दारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४–अ नुसार दंडनिय अपराध केला ? | |
| ३ | सरकारीपक्षाने हे सिध्द केले आहे काय कि वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वरील कार ज्या सार्वजनिक ठिकाणी चालविली त्या ठिकाणाच्या परिस्थीतीचा व उपयोगीतेचा आढावा न घेता त्याच्या ताब्यातील वरील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविले जे कि मनुष्य जिवीतास वा सार्वजनिक मालमत्तेस हानीकारक होउ शकते व त्याव्दारे मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार दंडनिय अपराध केला ? | नाही |
| ४ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

### मुददा क्र.१ ते ३ करिता –

८. आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ व कलम १८४ मोटार वाहन कायद्यानुसार लावलेले गुन्हे सिध्द करण्यासाठी सरकारीपक्षाने हे शाबीत करणे गरजेचे आहे की, दि. ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.३० ते ९.३५ वाजताच्या दरम्यान मौजा– नरखेड शिवार येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील अल्टो कार क्र. एम. एच. ३१ सी. एन. ०९१० निष्काळजीपणाने सार्वजनीक रस्त्यावर चालवली व रस्त्याच्या कडेला बसलेलया रविंद्र रेवतकर यांना धडक देवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारीपक्षाने ५ साक्षीदारांची

साक्ष नोंदवलेली आहे. उर्वरीत साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यासाठी सरकारीपक्षाला वारंवार संधी देण्यात आली. मात्र अनेकदा समंस व वॉरंट काढून देखील उर्वरीत साक्षीदार न्यायालयात साक्ष देण्यासाठी हजर राहिले नाहीत. त्यामुळे सरकारी वकीलांनी नि.क्र. १५ कडे त्यांचा पुरावा बंद करत असल्याची पुरसीस दिली.

९. सरकारीपक्षाने घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच शरद मदनकरची साक्ष नोंदवलेली आहे. मात्र त्याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, दि. ०९.०८.२०२२ रोजी तो घटनास्थळ पंचनाम्यासाठी कुठेही गेला नसल्याचे व केवळ पोलिसांच्या सांगण्यानुसार घटनास्थळ पंचनाम्यावर सही केल्याचे कथन केले आहे.

१०. सरकारीपक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार योगेश गोहळेची साक्ष नोंदवलेली आहे. मात्र त्याने त्याला घटनेबाबत काहीही माहीत नसल्याचे कथन केले आहे. या साक्षीदाराने सरकारीपक्षाला सहकार्य न केल्यामुळे सरकारी वकिलांनी उलटतपासणीच्या स्वरूपातील सुचक प्रश्न त्याला विचारले. मात्र त्यातूनही सरकारीपक्षाच्या दृष्टीने आवश्यक अशी कोणतीही बाब पटलावर आली नाही. उलटतपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की, जयस्तंभ चौकात त्याचे चहाचे दुकान आहे. मात्र त्याने हे स्पष्ट शब्दात नाकारले आहे की, दि. ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.१५ वाजता मृतक रवींद रेवतकरने त्याच्या चहाच्या टपरीवर चहा घेतला व बाजुच्या भावेश मदनकरच्या भांडयाच्या दुकानात जावून बसला. पुढे उलटतपासात त्याने हे नाकारले आहे की, त्याला मोठा आवाज आल्याने त्याने जावून पाहिले असता त्याला दिसले की, एका अल्टो कारने रवींद्र रेवतकरला समोरून धडक दिली व त्यात तो जखमी झाला.

१०. सरकारीपक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार महेश मदनकरची साक्ष नोंदवलेली असून त्याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, घटनेविषयी त्याला काहीही माहीत नाही. उलटतपासात त्याने हे स्पष्ट शब्दात नाकारले आहे की, दि. ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९ वाजता रवींद्र रेवतकर त्याच्या दुकानासमोर चहा पीत बसलेला असताना भरधाव वेगाने अल्टो कार आली व तिने रवींद्र रेवतकरला जोरदार धडक दिली. तसेच त्याच्या दुकानाच्या शटरला धडक देवून त्याचे शटर चपकवले. पुढे त्याने

उलटतपासात हे देखील नाकारले आहे की, त्याने जखमीला ॲबूंलंसला फोन करून त्यामधे उपचारासाठी नागपूरला नेले. मात्र त्याने दि. ०९.०८.२०२२ रोजी केवळ पोलिसांच्या सांगण्यावरून घटनास्थळ पंचनाम्यावर सही केल्याचे कथन केले आहे.

११. सरकारीपक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार खुशाल रेवतकरची साक्ष नोंदवलेली असून त्याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, घटनेदिवशी तो त्याच्या पानठेल्यावर असताना त्याला लोकांकडून समजले की, अपघात झालेला आहे. उलटतपासामध्ये त्याने हे स्पष्ट शब्दात नाकारले आहे की, दि. ०९.०८.२०२२ रोजी तो घरीच असताना त्याला समजले की, जयस्तंभ चौकामध्ये भावेश मदनकरच्या दुकानासमोर रवींद्र रेवतकर बसलेला असताना आरोपीच्या कारने त्याला धडक देवून जखमी केले.

१२. सरकारीपक्षाच्या कथनानुसार दि. ०९.०८.२०२२ रोजी सकाळी ९.३० ते ९.३५ वाजताच्या दरम्यान अपघातातील मृतक रवींद्र रेवतकर योगेश गोहळेच्या चहाच्या टपरीजवळ व भावेश मदनकरच्या भांडयाच्या दुकानाजवळ बसलेला असताना आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन भरधाव वेगाने चालवून मृत रवींद्र रेवतकरला जोराची धडक दिली. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. म्हणजेच सरकारीपक्षाच्या कथनानुसार भावेश मदनकर व योगेश गोहळे यांचे घटनास्थळावर चहाचे व भांडयाचे दुकान आहे, ते तोघेही सदर तथाकथीत अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. कारण सरकारीपक्षाच्या कथनानुसार सदरचा तथाकथीत अपघात हा दोघांच्याही दुकानासमोरच त्यांच्या समक्ष घडलेला आहे. मात्र योगेश गोहळे व भावेश मदनकरने त्यांच्या पुराव्यात हे स्पष्टपणे नाकारले आहे की, घटनेदिवशी आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन भरधाव वेगाने व निष्ळाजीपणाने चालवून त्यांच्या दुकानासमोर बसलेल्या रवींद्र रेवतकरला जोराची धडक देवून जखमी केले.

१३. सरकारी पक्षाच्या कथनानुसार सदर अपघातातील मृतक रविंद्र रेवतकर वर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे उपचार घेण्यात आले. तसेच नरखेड येथील सरकारी दवाखान्यात देखील उपचारासाठी नेण्यात आले. मात्र सरकारी पक्षाला वारंवार संधी देवून देखील सरकारी पक्षाने मृतक रविंद्र रेवतकरवर वैद्यकीय उपचार करणा–या

कोणत्याही वैद्यकीय अधिका–याची साक्ष नोंदवलेली नाही.

१४. सरकारीपक्षाच्या कथनानुसार सदरचा तथाकथीत अपघात नरखेड येथील बाजार चौकातील जयस्तंभ चौकात सकाळी ९ ते ९.३० वाजताच्या दरम्यान घडलेला आहे. त्यामुळे खरोखरच असा सरकारीपक्षाच्या कथनानुसार इतका मोठा अपघात होवून त्यामध्ये एखादी व्यक्ती गंभीर जखमी झाली असल्यास व सदरची घटना सकाळी बाजार चौकातील असल्यामुळे घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांनी सदरचा तथाकथीत अपघात पाहिल्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र असे असतानाही सरकारीपक्षाने कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही.

१५. आरोपीने घटनेदिवशी त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवून रविंद्र रेवतकरला धडक देवून त्याला गंभीर जखमी केले हे प्रत्यक्ष पाहणा–या कोणत्याही साक्षीदाराची साक्ष सरकारीपक्षाने वारंवार संधी देवून देखील नोंदवलेली नाही. त्यामुळे घटनेदिवशी आरोपी त्याच्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे व निष्काळजीपणाने सार्वजनीक रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून मानवी जिवीतास हाणी होईल या पध्दतीने चालवत होता व त्याने रवींद्र रेवतकरला त्याच्या ताब्यातील वाहनाने जोराची धडक दिवून त्याला गंभीररित्या जखमी केले व त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला ही बाब सरकारीपक्षाला निर्वीवादपणे सिध्द करता आली नाही. साहजिकच फौजदारी न्यायशास्त्रानुसार त्याचा फायदा आरोपीला देऊन त्याची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुददा क्र.१ ते ३ चे उत्तर मी नाकारार्थी देउन मुददा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. आरोपी सुरज कैलास फरकसे, रा. नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर याची भारतीय दंड संहितेच्या कलम २७९,३०४–अ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अनव्ये अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधनपत्र् व जामीनपत्र् रदद् करण्यात येते.

३. कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरिता आरोपीने सदर न्यायानिर्णयाविरुध्द अपील झाल्यास, अपील न्यायालयामध्ये हजर राहण्याकरिता रु.१५,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका, निकाल तारखेपासून ६ महिन्यांकरिता न्यायालयामध्ये दाखल करावा.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नरखेड, जि.नागपूर**

**ठिकाण–नरखेड**
**दिनांक–०८.०५.२०२५**

| | |
|---|---|
| बहस ऐकल्याचा दिनांक | ०८.०५.२०२५ |
| निकालाचा दिनांक | ०८.०५.२०२५ |
| निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक | ०८.०५.२०२५ |
| निकाल सही केल्याचा दिनांक | ०८.०५.२०२५ |

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि निकालाच्या पी.डी.एफ.फाईल मधील मजकुर हा मुळ निकालाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव– टी.एन. कांबळे (श्रेणी–३)

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.05.12 02:53:16 +1200